| MHLA120030202024 | **निशाणी क्रमांक ३१ वरील आदेश** |
| --- | --- |

सदरचा अर्ज वादी यांनी मुळ दाव्यात प्रतिवादी क्र.६ म्हणून अर्हंत घनशाम कांबळे यांना सामील करुन त्याअनुषंगाने दाव्यात दुरूस्तीकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादी असे कथन करतात की, सदरचा दावा वाटणी होऊन प्रत्यक्ष ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.१ यांनी म्हणणे दाखल करण्यासाठी वेळ मागितला व दाव्यात गुंतागूंत निर्माण करण्याच्या उद्देशाने यातील प्रतिवादी क्र.१ यांनी दि.२८/०९/२०२५ रोजी दाव्यातील मिळकत क्षेत्र ०१ हेक्टर, ०१ आर ही गरज नसतांना त्यांचा मुलगा अर्हंत घनशाम कांबळे यांच्या हक्कात बक्षीसपत्राआधारे रजिस्ट्रर्ड बक्षीसपत्र दस्त क्र.९२७४/२०२५ हे दुय्यम निबंधक कार्यालय, लातूर येथे केलेले आहे. त्यामुळे अर्हंत घनशाम कांबळे यांना दाव्यात प्रतिवादी क्र.६ म्हणून समाविष्ट करुन दाव्यात तशी दुरुस्तची परवानगी दयावी अशी विनंती वादी करतात.

०३. प्रतिवादींनी सदर अर्जावर आपले म्हणणे सादर करुन वादीने दिलेला अर्ज खोटा व बिनबुडाचा आहे. माहितीवर दिलेला आहे. सदरील प्रकरणात वादीने

दिलेला अर्ज, माहिती खोटी आहे म्हणून सदरील अर्ज खर्चासह नामंजुर करावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

०४. वादीतर्फे विधीज्ञ श्री.एच.व्ही.आलमले व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही.जे.सुर्यवंशी यांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला. प्रस्तुतचा दावा वडिलोपार्जित एकत्र कुटूंबाच्या मिळकतीची वाटणी होऊन प्रत्यक्ष ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकत या मौजे दापका येथील गट नंबर ५७/ब/१, ५८/अ/२, ५८/ब/२ व मौजे पोलादपुर, ता.निलंगा येथील गट नं.७२/क या आहेत. वादीने अर्जासोबतचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.३२ कडे दाखल केलेल आहे. वादी यांनी त्यांच्या अर्जातील कथनाच्या पृष्ठयर्थ यादी नि.क्र. ३४/१ कडे प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचा मुलगा अर्हंत घनशाम कांबळे यांच्या लाभात मौजे पोलादपुर, ता.निलंगा येथील गट नं.७२/क एकुण क्षेत्र २ हेक्टर २ आर पैकी १ हेक्टर १ आर या मिळकतीबाबतचे बक्षीसपत्र नं.९२७४/२०२५ ची प्रत दाखल केलेली आहे. त्यावरुन दावा मिळकतीपैकी गट नंबर ७२/क च्या संदर्भातील सदरचा बक्षीसदस्त दि.२८/०९/२०२५ रोजी झालेला दिसुन येतो. प्रस्तुतचा दावा दि.१२/११/२०२४ रोजी दाखल झालेला दिसुन येतो. तसेच सदर बक्षीसपत्राच्या अन्वये अर्हंत घनशाम कांबळे याचे नाव दावा मिळकतीस लागलेले आहे असे यादी नि.क्र.३४ कडे दाखल असलेल्या गट नं.७२/क चा ७/१२

उतारा व फेरफार नं.१३२९ वरुन दिसुन येते. त्यामुळे दावा मिळकतीच्या संदर्भात दावा दाखल झाल्यानंतर दावा मिळकतीचे हस्तांतरण झाले आहे असे दिसुन येते. त्यामुळे ज्याच्या नावे दावा मिळकतीचे हस्तांतरण झालेले आहे हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे त्यांच्या नावाची नोंद दाव्यात प्रतिवादी क्र.६ म्हणून समाविष्ट होणे हे दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयाकरीता अत्यंत महत्वाचे आहे. वरील चर्चेवरुन अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे असे मत नोंदवून सबब, खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज  मंजुर करण्यात येतो. |
| ०२. | वादीने १४ दिवसांच्या आत सदर दुरूस्ती करणेची आहे व दुरूस्ती प्रत दाखल करणेचे आहे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.02.17 11:22:46 +0530

निलंगा

दि. १६/०२/२०२६

( श्रीमती. के. पी. गाडे )

२ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर

निलंगा, जि.लातूर